PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Padchaya
Year: 1964

Song: Talat Wadye Bolali
Lyricist:

तालात वाद्ये बोलली
लागला गं दिलरूबा
गीत आले फुलूनी ओठी
धुंद श्रोत्यांची सभा
नृत्य झाले सजीव अंगी
नृत्य झाले सजीव अंगी
ताल भरला पैंजणी
ताल भरला पैंजणी

एक आला रसिक श्रोता
एक आला रसिक श्रोता
एक आला रसिक श्रोता
आाणि झुकली पापणी
आाणि झुकली पापणी

ओळखीचा ना मुळी तो
का हसावे वाटले
भेटता डोळयास डोळा
सूर कंठी दाटले

भेटता डोळयास डोळा
सूर कंठी दाटले
कंप भरला का शरीरी
कंप भरला का शरीरी
उगीच ढळली ओढणी
आणि झुकली पापणी
आणि झुकली पापणी

नाचताना थबकले मी
देह लाजेचा मनोरा
बोलणाऱ्या पैंजणांचा
गोल लोहाचा फुलोरा
बोलणाऱ्या पैंजणांचा
गोल लोहाचा फुलोरा
तोल धरीता ताल गेला
तोल धरीता ताल गेला
ध्यान नाही गायनी
आणि झुकली पापणी
आणि झुकली पापणी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*